# शिव सागरमोती ॲग्रोटेक, अकोला

**पिक : गहू** **वाण : लोक - १**

| अनु. क्र. | विवरण | तपशील |
|---|---|---|
| 01 | पिकाच्या वाणास योग्य कृषी विभाग | या पिकाला थंड हवामान मानवते |
| 02 | जमिनीची निवड व जमिनची मशागत | बागायती गव्हास पाण्याचा निचरा होणारी मध्यम ते भारी प्रतीची जमीन निवडावी खरीप पिकानंतर खोल नांगरटी करुन व वखरच्या तीन ते चार पाळ्या देवून जमीन भुसभुशीत करावी उताराला आडवे सारे पाडुन पेरणीसाठी जमीन तयार ठेवावी. |
| 03 | बिज प्रक्रिया वेळ / रासायनिक औषधे | 3 ग्रॅम थायरम /किलो आणि ॲझोटोबॅक्टर हे नत्रस्थिरीकरण करणारे जिवाणु व पी.एस.बी. 250 ग्रॅम / 10 ते 15 किलो बियाण्यास पेरणीपुर्वी चोळुन लावल्यास उत्पादनात वाढ मिळेल. |
| 04 | पेरणीची वेळ | ऑक्टोबर ते नोंव्हेबर |
| 05 | पेरणीकरिता लागणारे बियाणे-पेरणीची पध्दत (दोन ओळीतील व दोन रोपांमध्ये अंतर ठेवून / पेरणी) | 100 किलो / हेक्टर, दोन ओळीतील अंतर 23 सें.मी ठेवावे व बियाणे 5 ते 6 सें.मी. पेक्षा खोल पडणार नाही. |
| 06 | रासायनिक खते मात्रा व खत देण्याचा कालावधी व वेळ | 100 ते 120 मि.ली नत्र 50 ते 60 मि.ली. स्फुरद व 50 ते 60 किलो पालश एवढया रासायनिक मात्रा खताची द्यावी. |
| 07 | तण नियंत्रण - रासायनिक औषध व मात्रा व वेळ | आयसोप्रोटीरॉन (ग्रॅमिनॉन 50 % डब्ल्यु पी) 2.0 लि. हेक्टर उगवणपूर्वी किंवा उगवन पश्चात 30 ते 40 दिवसानंतर फवारावे. |
| 08 | रोग व किड नियंत्रण रासायनिक औषध मात्रा व वेळ | खोडकिडा - 40 ग्रॅम कार्बारील 50% पा.मि. भू. अधिक 10 लिटर पाणी मिसळुन फवारावे. तांबेरा- मॅन्कोझेब (डायथेन एम 45) 25 ग्रॅम 10 लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. काजळी किंवा काणी - नियंत्रणासाठी पेरणीपुर्वी बियाण्यास व्हिटॅव्हक्स किंवा कार्बेन्डाझिम 2.5 ग्रॅम / किलो याप्रमाणे बीज प्रक्रिया करावी. |
| 09 | पाणी देण्याचे वेळापत्रक | पहिले पाणी - 18 ते 20 दिवसांनी पेरणी झाल्यानंतर, दुसरे पाणी 30 ते 35 दिवसांनी तिसरे पाणी 50 ते 56 दिवसांनी व चौथे पाणी 70 ते 80 दिवसांनी द्यावे. |
| 10 | पिक काढण्याचा तपशील | 116 ते 120 दिवस |
| 11 | वाणाचे गुणवत्ता विषयक गुणधर्म | खाण्यास मऊ |
| 12 | अपेक्षीत उत्पन्न | 36 ते 42 क्विंटल प्रति हेक्टर |